**गोपनीय / अतितात्काळ**

क्र.पोमसं/२/१०२०/ नि.सू. (सशस्त्र) ०९-१०/१४३/०९

पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : **३१/ ०५/२०११**

विषय :- **वार्षिक सर्वसाधारण बदल्या- २०११**
सशस्त्र पोलीस उप अधीक्षक/ सहायक समादेशक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या.. ..

**संदर्भ :-** १. शासन आदेश, गृह विभाग, क्र. रापोसे - १७११/प्र.क्र.२८४/पोल -१(अ),
दिनांक ३१/५/२०११. **(प्रत संलग्न)**
२. या कार्यालयाचे समक्रमांकित, दि. ३१/५/२०११ चा बिनतारी संदेश

** ** **

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सशस्त्र पोलीस उपअधीक्षक / सहायक समादेशक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या वार्षिक सर्वसाधारण बदलीबाबतचे संदर्भाधीन शासन आदेश याद्वारे कळविण्यात येत आहेतः-

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

अ. उपरोक्त शासन आदेशांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी व तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास सादर करण्यात यावा.

ब. सदर आदेशांची प्रत, तसेच नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्याच्या आदेशांची प्रत सर्व संबधीत अधिका-यांना **व्यक्तिशः लेखी** अदा करुन त्या त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहित स्वाक्षरी घ्यावी व स्वाक्षरीत दुय्यम प्रत या कार्यालयास पाठवावी.

क. वर नमूद अधिका-यांच्या बाबतीत तसेच, त्यांच्या नवीन नियुक्तीच्या ठिकाणा संदर्भात मा. न्यायालयाचे अथवा मा. न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

ड. उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने **संबंधीत अधिका-यास तातडीने कार्यमुक्त करुन त्यांनी त्यांच्या नवीन नियुक्तीच्या पदावर तात्काळ हजर होण्याबाबत लेखी कडक सूचना द्याव्यात व त्याप्रमाणे** अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

इ. उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने संबधीत अधिका-यास त्यांच्या नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाल्याची तारीख तात्काळ या कार्यालयास कळवावी. तसेच, ते जर नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत तर तसे या कार्यालयास कळवावे आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दिनांक १६/९/८३, ११/१/८४ व दि. १०/२/९१ तसेच क्र. पोमसं /३/ ५५०७/६/९७, दिनांक १३/२/९७ च्या परिपत्रकातील सुचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

*(डॉ. बी. के. उपाध्याय )*
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना )
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.राज्य, मुंबई
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१ पुणे /३, जालना/ ७, दौंड/१२ हिंगोली

प्रत सादर :- अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
( लक्षवेध :- श्री. प्र.भि.चव्हाण, कक्ष अधिकारी, पोल-१अ
त्यांचे आदेश क्ररापोसे - १७११/प्र.क्र.२८४/पोल -१(अ), दि. ३१ /५/२०११ चे संदर्भात)

प्रतः- महालेखापाल- १/२, लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/जालना/हिंगोली
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक २ -अ, ३-अ, ९, ३६ व ४० (दक्षता विभाग) संगणक कक्ष.

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

शासन आदेश क्रमांकः रापोसे-१७११/प्र.क्र.२८४/पोल-१(अ)

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक :**३० मे, २०११.**

**शासन आदेश :-** महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम क्र.४(४)(एक) मधील तरतुदीच्या अनुषंगाने, बदली करण्यास सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेने सःशस्त्र पोलीस उपअधीक्षक/ सहाय्यक समादेशक या संवर्गातील खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या अधिकाऱ्यांची प्रशासकीय कारणास्तव/विनंतीवरुन बदली करुन त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर नियुक्ती करण्यात येत आहेः-

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नांव व सध्याची नियुक्ती | नवीन नियुक्ती |
|---|---|---|
| १ | श्री. उत्तरेश्वर के. गलधर, सहायक समादेशक, रा. रा.पो.बल गट क्र.०७ दौंड | **सहायक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१, पुणे** |
| २ | श्री.जयराम लोढजी फुफाटे, सहायक समादेशक, रा.रा.पो.बल.गट क्र.०३, जालना | **सहायक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१२, हिंगोली** |

२. वर नमूद अधिकाऱ्यांच्या बाबतीत तसेच त्यांच्या नवीन नियुक्तीच्या ठिकाणासंदर्भात मा.न्यायालयाचे अथवा मा.न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**३. उपरोक्त अधिकाऱ्यांना सध्याच्या पदावरुन तातडीने कार्यमुक्त करुन त्यांच्या नवीन नियुक्तीच्या पदावर रुजू होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( प्र. भि. चव्हाण )**

**कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

- महालेखापाल-१/२, लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.
- अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, पुणे
- मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
- मा. राज्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

- लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
- निवासी लेखाधिकारी, मुंबई.
- संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
- संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत)
- निवडनस्ती / पोल-१(अ)